**विषय** :- आस्थापनेवरील अग्निशमन विभागाच्या पदांना सुधारित वेतनश्रेणी लागु करुन प्रशासकिय मान्यता मिळणेबाबत.

**प्रस्तावना**

भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागाच्या आस्थापणेवरील वॉचरुम ऑपरेटर, फायरमन, ड्रायव्हर ऑपरेटर, लिडिंग फायरमन, सब स्टेशन ऑफिसर, स्टेशन ऑफिसर, उप मुख्य अग्निशमन अधिकारी, मुख्य अग्निशमन अधिकारी इत्यादी पदे मंजूर आहेत, परंतु सदर पदांची वेतन श्रेणी निश्चिती करण्यात आलेली नसल्याने अग्निशमन विभागातील कर्मचारी यांना चुकीची व कमी वेतनश्रेणी दिली जात आहे. ठाणे जिल्हयातील इतर ड वर्ग महानगरपालिका व भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेमधील अग्निशमन विभागातील कर्मचारी यांच्या वेतनात खुप तफावत आहे. वेतन दुरुस्तीबाबत भिवंडी महानगरपालिकेकडे अनेकदा अर्ज करुन सुदधा अद्याप पर्यंत कोणतीही सुधारणा करण्यात आली नाही त्यामुळे भिवंडी मनपाच्या कर्मचारी यांच्यावर अन्याय होत आहे.

भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेत अग्निशमन विभागातील मंजुर असलेल्या पदांची इतर महानगरपालिकेप्रमाणे ०६ व्या वेतन आयोगापासुन वेतनश्रेणी सुधारित करून प्रशासकिय ठराव करुन शासनाकडे मंजुरी करीता पाठविण्यात यावा अशी विनंती केली आहे.

मनपाच्या आस्थापनेवरील अग्निशमन विभागातील सद्यास्थिती पदांचा वेतनश्रेणीबाबत गोषवारा खालिलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | पदाचे नाव | वेतनश्रेणी |
|---|---|---|
| १ | स्टेशन ऑफिसर | ९३००-३४८०० ग्रेडपे ४२०० |
| २ | सब स्टेशन ऑफिसर | ९३००-३४८०० ग्रेडपे २४०० |
| ३ | लिडिंग फायरमन | ५२००-२०२०० ग्रेडपे २००० |
| ४ | फायरमन | ५२००-२०२०० ग्रेडपे १८०० |
| ५ | चालक यंत्रचालक | ५२००-२०२०० ग्रेडपे १९०० |
| ६ | वॉचरूम ऑपरेटर | ५२००-२०२०० ग्रेडपे १९०० |

सदर अर्जाच्या अनुषंगाने इतर महानगरपालिकेतील वेतनश्रेणी खालीलप्रमाणे आहे.

**१. उल्हासनगर महानगरपालिका**

| अ.क्र. | पदनाम | वेतनश्रेणी |
|---|---|---|
| १ | सहा. विभागीय अग्निशमन अधिकारी | ९३००-३४८०० ग्रेडपे ४४०० |
| २ | अग्निशमन केंद्र अधिकारी | ९३००-३४८०० ग्रेडपे ४३०० |

| | | |
|---|---|---|
| ३ | सहा अग्निशमन केंद्र अधिकारी | ९३००-३४८०० ग्रेडपे ४२०० |
| ४ | प्रमुख अग्निशमन विमोचक | ५२००-२०२०० ग्रेडपे २४०० |
| ५ | अग्निशमन विमोचक | ५२००-२०२०० ग्रेडपे १९०० |

**२. कल्याण डोबिंवली महानगरपालिका**

| अ.क्र. | पदनाम | वेतनश्रेणी |
|---|---|---|
| १ | मुख्य अग्निशमन अधिकारी | ९३००-३४८०० ग्रेडपे ५४०० |
| २ | सहा. अग्निशमन अधिकारी | ९३००-३४८०० ग्रेडपे ४४०० |
| ३ | स्थानक अधिकारी | ९३००-३४८०० ग्रेडपे ४३०० |
| ४ | उप स्थानक अधिकारी | ९३००-३४८०० ग्रेडपे ४२०० |
| ५ | ड्रायव्हर कम ऑपरेटर | ५२००-२०२०० ग्रेडपे २४०० |
| ६ | लिडिंग फायरमन | ५२००-२०२०० ग्रेडपे २४०० |
| ७ | फायरमन | ५२००-२०२००० ग्रेडपे १९०० |

**३. मिरा भाईदर महानगरपालिका**

| अ.क्र. | पदाचे नाव | वेतनश्रेणी |
|---|---|---|
| १ | मुख्य अग्निशमन अधिकारी | १५६००-३९१०० ग्रेडपे ५४०० |
| २ | उप मुख्य अग्निशमन अधिकारी | ९३००-३४८०० ग्रेडपे ४६०० |
| ३ | अग्निशमन केंद्र अधिकारी | ९३००-३४८०० ग्रेडपे ४४०० |
| ४ | सहाय्यक अग्निशमन केंद्र अधिकारी | ९३००-३४८०० ग्रेडपे ४२०० |
| ५ | अग्निशमन प्रणेता | ५२००-२०२०० ग्रेडपे २४०० |
| ६ | चालक यंत्रचालक | ५२००-२०२०० ग्रेडपे २४०० |
| ७ | अग्निशमन | ५२००-२०२०० ग्रेडपे २००० |

भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागाच्या आस्थापनेवरील पदाना राज्यातील इतर महानगरपालिकेतील वेतनश्रेणीप्रमाणे खालील तक्त्यात सुधारित वेतनश्रेणी नमुद करण्यात येत असुन शासन निर्णय क्रमांकः- भिनिम-२०२२/प्र.क्र.

१०१/नवि-२३, दि.३०/११/२०२२ नुसार अग्निशमन विभागातील मंजुर पदे, भरलेली पदे व रिक्त पदे यांचा तपशिल खालीलप्रमाणे,

| अ.क्र. | पदाचे नाव | मंजुर पदे | भरलेली पदे | रिक्त पदे |
|---|---|---|---|---|
| १ | मुख्य अग्निशमन अधिकारी | १ | ० | १ |
| २ | उप मुख्य अग्निशमन अधिकारी | १ | ० | १ |
| ३ | स्टेशन ऑफिसर | ५ | ० | ५ |
| ४ | सब स्टेशन ऑफिसर | १२ | १ | ११ |
| ५ | लिडिंग फायरमन | १५ | १ | १४ |
| ६ | फायरमन | १०० | ४६ | ५४ |
| एकुण | | १३४ | ४८ | ८६ |

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागाच्या आस्थापनेवर सद्यःस्थितीत सबस्टेशन ऑफिसर-१ पद, लिंडींग फायरमन- १ पद, फायरमन- ४६ पद कार्यरत आहेत. सदर कार्यरत पदांवर ७ व्या वेतन आयोगानुसार सद्याच्या वेतनश्रेणीनुसार रु. ३,०४,५२,१२४/- मात्र खर्च होत असून उपरोक्तप्रमाणे कार्यरत पदांना सुधारित वेतनश्रेणी मंजुरी मिळाल्यानंतर त्यानुसार रु. ३,३५,२३,९२०/- मात्र वार्षिक वेतन अदा करावा लागेल. सबब, सुधारित वेतनश्रेणीमधून असुधारित वेतनश्रेणीचा वार्षिक खर्च वजा करता रु. ३०,७१,७९६/- मात्र सदर कार्यरत पदांना वार्षिक खर्च अपेक्षित आहे. त्याप्रमाणे तुलनात्मक तक्ता खालिलप्रमाणे :-

| अ.क्र. | पदनाम | ७ व्या वेतन आयोगाच्या सुधारित वेतनश्रेणीनुसार होणारा अपेक्षित खर्च | ७ व्या वेतन आयोगाच्या असुधारित वेतनश्रेणीनुसार होत असलेला खर्च | वेतन वाढ |
|---|---|---|---|---|
| १ | सबस्टेशन ऑफिसर | १२,६१,२००/- | ११,४९,२४०/- | १,११,९६०/- |
| २ | लिंडींग फायरमन | ७,५५,२८०/- | ७,२८,४००/- | २६,८८०/- |
| ३ | फायरमन | ३,१५,०७,४४०/- | २,८५,७४,४८४/- | २९,३२,९५६/- |
| एकूण वार्षिक खर्च | | २०४०६७२० | ३,३५,२३,९२०/- | ३,०४,५२,१२४/- |

भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागाच्या आस्थापनेवरील पदाना राज्यातील इतर महानगरपालिकेतील वेतनश्रेणीप्रमाणे खालील तक्त्यात सुधारित वेतनश्रेणी नमुद करण्यात आली असुन अग्निशमन विभागातील मंजुर पदांना खालीलप्रमाणे वेतनश्रेणी लागु करणेकामी प्रस्तावित करण्यात येत आहे.

| अ.क्र. | पदाचे नाव | वेतनश्रेणी |
|---|---|---|
| १ | मुख्य अग्निशमन अधिकारी | १५६००-३९१०० ग्रेडपे ५४०० |
| २ | उप मुख्य अग्निशमन अधिकारी | १५६००-३९१०० ग्रेडपे ४६०० |
| ३ | स्टेशन ऑफिसर / अग्निशमन केंद्र अधिकारी | ९३००-३४८०० ग्रेडपे ४४०० |
| ४ | सब स्टेशन ऑफिसर / उप अग्निशमन केंद्र अधिकारी | ९३००-३४८०० ग्रेडपे ४२०० |
| ५ | लिडिंग फायरमन | ५२००-२०२०० ग्रेडपे २४०० |
| ६ | फायरमन | ५२००-२०२०० ग्रेडपे १९०० |

सबब, अग्निशमन विभागाच्या आस्थापनेवरील उपरोक्त पदांच्या वेतनश्रेणीत सुधारणा करणेबाबतचा प्रस्ताव मा. महासभा व मा. स्थायी समिती अस्तित्वात नसल्याने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४५२ (अ) (१) नुसार प्रशासकीय मान्यतेकरीता सादर करण्यात आलेला आहे.

**प्रशासकीय ठराव क्रमांक** 336 **दिनांक** 28/09 **/२०२**3

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील अग्निशमन विभागाच्या पदांना सुधारित वेतनश्रेणीत सुधारणा करुन प्रशासकिय मान्यता मिळणेबाबतचा प्रस्ताव सद्य:स्थितीत मा. महासभा व मा. स्थायी समिती अस्तित्वात नसल्याने तसेच महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्र. एमसीओ २०२०/प्र.क्र. ७१ (भाग-१) नवि-१४, दि.०६/०६/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४५२ अ (१) मधील तरतुदीनुसार मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी अजय वैद्य, प्रशासक तथा आयुक्त, भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका या सोबत जोडलेल्या प्रस्तावास प्रशासकीय मान्यता देत आहे.

(अजय वैद्य)

**प्रशासक तथा आयुक्त**

**भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका**

# भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका
## वैद्यकिय आरोग्य विभाग

प्रेषक :- मा. आयुक्त सो., भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका

प्रति :- नगर सचिव भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका

विषय- एकात्मिक आरोग्य व कुटुंब कल्याण सोसायटी (आर.सी.एच.-II) अंतर्गत कार्यरत ३५ अधिकारी व कर्मचारी यांना सन २०२३-२४ या कालावधीत मुदत वाढ देणे कामी प्रशासकीय ठराव बाबत .

उपरोक्त संदर्भिय विषयास अनुसरुन भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रा करीता शासन स्तरावरील अटी व शर्तीच्या अधिन राहून मनपा स्तरावर एकात्मिक आरोग्य व कुटुंब कल्याण सोसायटी आर.सी.एच.- II अंतर्गत शासनाचे ५ प्राथमिक नागरी आरोग्य केंद्र व आर.सी.एच.- II चे १० प्राथमिक नागरी आरोग्य केंद्र असे एकूण १५ नागरी आरोग्य केंद्र स्थापित करुन या ठिकाणी शहरातील नागरीकांना औषधोपचाराच्या बाह्यरुग्ण सेवा तसेच कुटुंब कल्याण अंतर्गत महिलाचे व बालकांचे औषधोपचार व लसीकरण व गृहभेटी तसेच शासनाच्या निर्देशाप्रमाणे राज्यस्तरीय कार्यक्रम " पल्स पोलिओ, गोवर रुबेला, रोटा व्हायरस, मिशन इंद्रधनुष्य यांसारखे कार्यक्रम तसेच जननी सुरक्षा योजना, जननी शिशु सुरक्षा योजना, प्रधानमंत्री मातृ वंदना योजना अशा योजना नियमित राबविण्यात येतात.

याअनुषंगाने महानगरपालिका स्तरावर आर.सी.एच.- II हा कार्यक्रम राबविण्यात येत आहे. १ एप्रिल २००५ पासून संपूर्ण राज्यभर आर.सी.एच.-II हा कार्यक्रम कार्यान्वित आहे. कार्यक्रमांचा मूळ हेतु माता मृत्यु दर व बाल मृत्यु दर कमी करणे असा आहे. याकरीता शासनाने भिवडी महानगरपालिका करीता वर्षनिहाय अनुदान मंजूर करून एप्रिल २००५ ते मार्च २०१० पर्यंत मंजुर करण्यात आला. याकरीता २००७-०८ करीता १०० % अनुदान देय होते. सन २००८-०९ मध्ये कर्मचा-यांच्या वेतनावरील ५० % खर्च केंद्र शासनाकडून व उर्वरीत ५० % खर्च महानगरपालिकेमार्फत करण्यात आला. सन २००९-१० मध्ये केंद्र शासन व भिवंडी नि. शहर महानगरपालिका खर्चाचा हिस्सा २५ % व ७५ % असा होता. तसेच १ एप्रिल २०१० नंतर १०० % वेतन महानगरपालिकेने देणे बंधनकारक करण्यात आले.

नुसार महानगर पालिका निधीतून सन २०१० पासून मानधन अदा केला जात आहे. त्याच प्रमाणे दर वर्षी नियमित स्वरुपात मुदतवाढ देण्यात येत आहे .सन २०२१-२०२२ या वर्षात प्रजनन व बाल आरोग्य कार्यक्रम फेज-II (RCH) अंतर्गत आस्थापना खर्च रक्कम रु. **१००** लक्ष असा आहे

या मध्ये वैद्यकिय अधिकारी -3, ए.एन.एम.- 3०, लिपिक-१ , डाटा ऐंट्री ऑपरेटर-१ असे एकूण ३5 अधिकारी व कर्मचारी कार्यालय व नागरी आरोग्य केंद्र येथे सद्यस्थितीत कार्यरत आहेत.

तरी भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका अंतर्गत प्रजनन व बाल आरोग्य कार्यक्रम फेज-II (RCH) अंतर्गत उपरोक्त नमुद ३5 कर्मचा-यांनी वैद्यकिय आरोग्य विभागात मानधन तत्वावर केलेली दिर्घ सेवा, सदर कर्मचा-यांनी कोविड-१९ प्रादुर्भाव काळात केलेले काम तसेच वैद्यकिय आरोग्य सेवेची आवश्यकता नुसत सन 2023 -2024 या वित्तीय वर्षात मुदतवाढ होणे कामी चे प्रशासकिय ठरवास मान्यता होणे कमी सादर

यानुसार खालील नमुद केल्याप्रमाणे सन २००७ पासून विहीत पद्धतीने शासनाच्या मार्गदर्शक सुचनांप्रमाणे करार तत्वावरील पदे भरण्यात आली आहेत. यानुसार खालीलप्रमाणे अधिकारी व कर्मचारी कार्यरत आहेत.

| अ.क्र | अधिकारी/कर्मचा-यांचे नाव | हुद्दा | नियुक्ती दिनांक |
|---|---|---|---|
| १ | श्रीम. लता अनिल गायकवाड/डोणे | ए.एन.एम. | ०५/०४/२००७ |
| २ | श्रीम. मनिषा रविंद्र कराळे/भोईर | ए.एन.एम. | ०५/०४/२००७ |
| ३ | श्री. विजय चंदर राठोड | लिपीक | ०५/०४/२००७ |

| | | | |
|---|---|---|---|
| ४ | श्रीम. वंदना प्रकाश महाले | ए.एन.एम. | १९/०९/२००८ |
| ५ | श्री. प्रविण शशीकांत भडांगे | डेटा ऐंट्री ऑपरेटर | २८/०२/२००९ |
| ६ | डॉ. स्वप्नाली विनायक जाधव | वैद्यकिय अधिकारी | ०५/०६/२०१० |
| ७ | श्रीम. छाया खोब्रागडे/रामटेके | ए.एन.एम. | ०५/०६/२०१० |
| ८ | श्रीम. रजनी गौतम बनसोडे | ए.एन.एम. | ०५/०६/२०१० |
| ९ | श्रीम. अरुणा आदेश चव्हाण/ कांबळे | ए.एन.एम. | ०५/०६/२०१० |
| १० | श्रीम. आदीती मिलिंद ढगे | ए.एन.एम. | ०५/०६/२०१० |
| ११ | डॉ. मिनल पष्टे | वैद्यकिय अधिकारी | १२/०८/२०१० |
| १२ | श्रीम. रंजना गायकवाड | ए.एन.एम. | ०८/०१/२०१२ |
| १३ | श्रीम. पंचशिला पाठारे/गायकवाड | ए.एन.एम. | ०८/०१/२०१२ |
| १४ | डॉ. राजकुमार शर्मा | वैद्यकिय अधिकारी | १०/०१/२०१३ |
| १५ | श्रीम. निता शाम हरड | ए.एन.एम. | ०५/०२/२०१३ |
| १६ | श्रीम. सोनाली लोटन ओतारी | ए.एन.एम. | ०५/०२/२०१३ |
| १७ | श्रीम. रोशनी घरत/स्नेहल पाटील | ए.एन.एम. | ०५/०२/२०१३ |
| १८ | श्रीम. जानकी वांगड/दर्शना दिवा | ए.एन.एम. | १७/१२/२०१४ |
| १९ | श्रीम. शर्मिला घरत | ए.एन.एम. | १७/१२/२०१४ |
| २० | श्रीम. नम्रता घोडेराव | ए.एन.एम. | १७/१२/२०१४ |
| २१ | श्रीम. दिपाली गायकवाड | ए.एन.एम. | १७/१२/२०१४ |
| २२ | श्रीम. संगिता बागुल | ए.एन.एम. | १७/१२/२०१४ |
| २३ | श्रीम. अरुणा राऊत | ए.एन.एम. | १७/१२/२०१४ |
| २४ | श्रीम. मनिषा गढरी | ए.एन.एम. | १७/१२/२०१४ |
| २५ | श्रीम. नाजुका शेंडे | ए.एन.एम. | १७/१२/२०१४ |
| २६ | श्रीम. वंदना नाचरे | ए.एन.एम. | १७/१२/२०१४ |
| २७ | श्रीम. जयश्री पाटील | ए.एन.एम. | १७/१२/२०१४ |
| २८ | श्रीम. जागृती लुटे | ए.एन.एम. | १७/१२/२०१४ |
| २९ | श्रीम. राजश्री प्रविण परदेशी | ए.एन.एम. | १८/०२/२०१४ |
| ३० | श्रीम. नमिता बाळाराम ठाकरे | ए.एन.एम. | १८/०२/२०१४ |
| ३१ | श्रीम. लता महेंद्र धुम | ए.एन.एम. | १८/०२/२०१४ |
| ३२ | श्रीम. प्रतिक्षा सदानंद ठाकरे | ए.एन.एम. | १८/०२/२०१४ |
| ३३ | श्रीम. निकीता दिलीप पवार | ए.एन.एम. | १८/०२/२०१४ |
| ३४ | श्रीम. सुजाता संजय बांगर | ए.एन.एम. | १८/०२/२०१४ |
| ३५ | श्रीम. कविता गणपत पाटील | ए.एन.एम. | १३/०१/२०१४ |

सदरच्या कर्मचा-यांचे १०० % वेतन महानगरपालिका निधीतून सन २०१० पासून अदा केला जात आहे. सन २०२१-२०२२ या वर्षात प्रजनन व बाल आरोग्य कार्यक्रम फेज-II (RCH) अंतर्गत आस्थापना खर्च रक्कम रु.१०० लक्ष असा आहे. वैद्यकिय अधिकारी -३, ए.एन.एम.- ३०, लिपिक-१, डाटा ऐंट्री ऑपरेटर-१ असे एकूण ३५अधिकारी व कर्मचारी कार्यालय व नागरी आरोग्य केंद्र येथे सद्यस्थितीत कार्यरत आहेत.

प्रजनन व बाल आरोग्य कार्यक्रम फेज-II (RCH) अंतर्गत कार्यरत कर्मचारी सन २०२३-२४ या वित्तीय वर्षात मुदत वाढ मिळणे कामी प्रशासकीय ठराव होणे कामी विनंती आहे.

आयुक्त तथा प्रशासक
भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका

दिनांक :- ३१/ ९ /२०२४

**प्रस्तावना**

विषय- एकात्मिक आरोग्य व कुटुंब कल्याण सोसायटी (आर.सी.एच.-II) अंतर्गत कार्यरत ३५ अधिकारी व कर्मचारी यांना सन २०२३-२४ या कालावधीत मुदत वाढ देणे कामी प्रशासकीय ठराव

उपरोक्त विषयास अनुसरुन भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रा करीता शासन स्तरावरील अटी व शर्तीच्या अधिन राहून मनपा स्तरावर एकात्मिक आरोग्य व कुटुंब कल्याण सोसायटी आर.सी.एच.- II अंतर्गत शासनाचे ५ प्राथमिक नागरी आरोग्य केंद्र व आर.सी.एच.- II चे १० प्राथमिक नागरी आरोग्य केंद्र असे एकूण १५ नागरी आरोग्य केंद्र स्थापित करुन या ठिकाणी शहरातील नागरीकांना औषधोपचाराच्या बाह्यरुग्ण सेवा तसेच कुटुंब कल्याण अंतर्गत महिलाचे व बालकांचे औषधोपचार व लसीकरण व गृहभेटी तसेच शासनाच्या निर्देशाप्रमाणे राज्यस्तरीय कार्यक्रम " पल्स पोलिओ, गोवर रुबेला, रोटा व्हायरस, मिशन इंद्रधनुष्य यांसारखे कार्यक्रम तसेच जननी सुरक्षा योजना, जननी शिशु सुरक्षा योजना, प्रधानमंत्री मातृ वंदना योजना अशा योजना नियमित राबविण्यात येतात.

याअनुषंगाने महानगरपालिका स्तरावर आर.सी.एच.- II हा कार्यक्रम राबविण्यात येत आहे. १ एप्रिल २००५ पासून संपूर्ण राज्यभर आर.सी.एच.-II हा कार्यक्रम कार्यान्वित आहे. कार्यक्रमांचा मूळ हेतु माता मृत्यु दर व बाल मृत्यु दर कमी करणे असा आहे. याकरीता शासनाने भिवडी महानगरपालिका करीता वर्षनिहाय अनुदान मंजूर करून एप्रिल २००५ ते मार्च २०१० पर्यंत मंजुर करण्यात आला. याकरीता २००७-०८ करीता १०० % अनुदान देय होते. सन २००८-०९ मध्ये कर्मचा-यांच्या वेतनावरील ५० % खर्च केंद्र शासनाकडून व उर्वरीत ५० % खर्च महानगरपालिकेमार्फत करण्यात आला. सन २००९-१० मध्ये केंद्र शासन व भिवंडी नि. शहर महानगरपालिका खर्चाचा हिस्सा २५ % व ७५ % असा होता. तसेच १ एप्रिल २०१० नंतर १०० % वेतन महानगरपालिकेने देणे बंधनकारक करण्यात आले.

नुसार महानगर पालिका निधीतून सन २०१० पासून मानधन अदा केला जात आहे. त्याच प्रमाणे दर वर्षी नियमित स्वरुपात मुदतवाढ देण्यात येत आहे .सन २०२१-२०२२ या वर्षात प्रजनन व बाल आरोग्य कार्यक्रम फेज-II (RCH) अंतर्गत आस्थापना खर्च रक्कम रु. **१००** लक्ष असा आहे

**या मध्ये वैद्यकिय अधिकारी -3, ए.एन.एम.- 30, लिपिक-१, डाटा एंट्री ऑपरेटर-१ असे एकूण ३5 अधिकारी व कर्मचारी कार्यालय व नागरी आरोग्य केंद्र येथे सद्यस्थितीत कार्यरत आहेत.**

तरी भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका अंतर्गत प्रजनन व बाल आरोग्य कार्यक्रम फेज-II (RCH) अंतर्गत उपरोक्त नमुद ३5 कर्मचा-यांनी वैद्यकिय आरोग्य विभागात मानधन तत्वावर केलेली दिर्घ सेवा, सदर कर्मचा-यांनी कोविड-१९ प्रादुर्भाव काळात केलेले काम तसेच वैद्यकिय आरोग्य सेवेची आवश्यकता लक्षात घेता सन 2023 -2024 या वित्तीय वर्षात मुदतवाढ होणे कामी चे प्रशासकिय ठरवास मान्यता .

**ठराव क्र.:-** ३३८

आर.सी.एच.-II कार्यक्रम मध्ये राज्य कुटुंब कल्याण अतिरीक्त संचालक माता बाल संगोपन शालेय आरोग्य यांनी भिवडी महानगरपालिका करीता वर्षनिहाय अनुदान मंजूर करून एप्रिल २००५ ते मार्च २०१० पर्यंत मंजुर करण्यात आला. याकरीता २००७-०८ करीता १०० % अनुदान देय होते. सन २००८-०९ मध्ये कर्मचा-यांच्या वेतनावरील ५० % खर्च केंद्र शासनाकडून व उर्वरीत ५० % खर्च महानगरपालिकेमार्फत करण्यात आला. सन २००९-१० मध्ये केंद्र शासन व भिवंडी नि. शहर महानगरपालिका खर्चाचा हिस्सा २५ % व ७५ % असा होता. तसेच १ एप्रिल २०१० नंतर १०० % वेतन महानगरपालिकेने देणे बंधनकारक करण्यात आले. भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका अंतर्गत प्रजनन व बाल आरोग्य कार्यक्रम फेज-II (RCH) अंतर्गत उपरोक्त नमुद ३5 कर्मचा-यांनी वैद्यकिय आरोग्य विभागात मानधन तत्वावर केलेली दिर्घ सेवा, सदर कर्मचा-यांनी कोविड-१९ प्रादुर्भाव काळात केलेले काम तसेच वैद्यकिय आरोग्य सेवेची आवश्यकता लक्षात घेता महानगर पालिका निधीतून सन २०१० पासून 35 कर्मचारी यांचे मानधन अदा केला जात आहे. त्याच प्रमाणे दर वर्षी नियमित

स्वरुपात मुदतवाढ देण्यात येत आहे .सन २०२३-२०२४ या वर्षात प्रजनन व बाल आरोग्य कार्यक्रम फेज-II (RCH) अंतर्गत सदर कात्रती कर्मचारी मानधनाकरिता आस्थापना खर्च रक्कम रु. १०० लक्ष असा आहे.

या नुसार सन 2023-24 य वित्तीय वर्षाकरिता मुदतवाढ देणे कामी मान्यता देण्यात यात आहे .

प्रशासक तथा आयुक्त
भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका

प्रेषक- मा.प्रशासक तथा आयुक्त, भि.नि.श. महानगरपालिका

प्रति-नगरसचिव,भि.नि.श.महानगरपालिका

विषय- अग्निशमन विभागाकरिता अंदाजपत्रकिय पुनर्विनियोजन प्रस्तावा बाबत.

प्रस्तावना,

उपरोक्त विषयान्वे सन २०२३-२४ या वर्षात भिवंडी शहराचा भौगोलीक परिस्थितीचा विचार करता तसेच असलेले उदयोग धंदे जसे पावरलुम, डाईंग, मनी कारखाने व इतर छोटेमोठे उदयोगधंदे यांचा विचार करता तसेच भिवंडी मनपाहद्दीत असलेल्या होत असलेल्या उंच इमारती यांचा विचार करता तसेच भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका हद्दीलगत असलेल्या ग्रामीन भागामध्ये असलेल्या रसायनांचे गोडावुन, कारखाने, कंपनी, व निरनिराळया प्रकारचे उद्योग धंदे व्यवसायांना आगीसारखी किंवा इतर दुर्घटना घडल्यास त्या परिसरात अग्निशमन सेवा उपलब्ध नसल्याने भिवंडी मनपा अग्निशमन दलाला सेवा पुरवावी लागते यामुळे अग्निशमन विभागाच्या सक्षमीकरणांकरिता एक नग नविन १४००० लिटर क्षमतेचे फायर वॉटर ब्राउझर व एक मल्टीपरपझ फायर इंजिन खरेदी करण्याचे प्रस्तावित करण्यात आलेले आहे व त्याकरिता बाजारभावानुसार रु.३,६६,७०,०००/- (अक्षरी- तीन कोटी सहासष्ठ लाख सत्तर हजार रुपए मात्र) खर्च अपेक्षित आहे.

अग्निशमन विभागाच्या सन २०२३-२४ च्या अत्याधुनिक अग्निशमन गाडी खरेदी या लेखाशिर्षकामध्ये रु.२ कोटी तरतुद आहे व त्यामधुन आजच्या तारखेपर्यंत कोणताही खर्च करण्यात आलेला नाही. परंतु एकुण आवश्यक खर्चाकरिता रु. १,६६,७०,०००/- कमी पडत आहे. सदरचे प्रस्तावित काम करण्यासाठी अत्याधुनिक अग्निशमन वाहने खरेदी या लेखाशिर्षकामध्ये इतर लेखा शिर्षकामधुन रु.१,६६,७०,०००/- चे पुर्नविनियोजन करावे लागेल. त्याकरिता अग्निशमन विभागाच्या सन २०२३-२४ च्या अर्थसंकल्पातील अग्निशमन साधनसामुग्री खरेदी या लेखाशिर्षकामध्ये रु.२ कोटी तरतुद करण्यात आलेली होती त्यापैकी रु.६,२३,०००/- खर्च करण्यात आलेले असुन त्यामध्ये रु.१,९३,७७,०००/- शिल्लक आहेत. प्रस्तावित कामाकरिता अग्निशमन विभागाच्या अत्याधुनिक अग्निशमन गाडी खरेदी या लेखाशिर्षकामध्ये अग्निशमन साधन सामुग्री या लेखाशिर्षकातुन रु.१,६६,७०,०००/- पुर्नविनियोजन करणे आवश्यक आहे.सन-२०२३-२०२४ च्या रक्कम रु.१,६६,७०,०००/- या मुळ अंदाजपत्रकिय महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०१ मुळ अर्थसंकल्प पुनर्वीनियोजन मा.स्थायी समितीच्या मान्यता मिळणेकामी आवश्यक आहे पण स्थायी समिती अस्तीत्वात नसल्याने त्याचे संपुर्ण अधिकार पालिका प्रशासक यांना प्राप्त झालेले आहे.त्यानुसार अर्थसंकल्प पुनर्वीनियोजन प्रस्ताव मान्यतेस सविनय सादर,

सोबत – नमुना क्रं.१० नियम ३०(३) विवरण पत्र सादर करण्यात आलेले आहे.

उपआयुक्त (मुख्या)
भिवंडी नि. शहर महानगरपालिका

ठराव क्रं. ३३८ दिनांक- ३१/०९/२०२४

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक प्रतिनि-२०२३/प्र.क्र.११९/नवी-१४, दिनांक-०९/०६/२०२३ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ अ (१अ) तरतुदी नुसार मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी अजय वैद्य, प्रशासक तथा आयुक्त भिवंडी नि.शहर महानगरपालिका,जनसंपर्क अधिकारी यांनी प्रस्तावित केल्यानुसार एक नग नविन १४००० लिटर क्षमतेचे फायर वॉटर ब्राउझर व एक मल्टीपरपझ फायर इंजिन खरेदी करणेकरिता आवश्यक निधी खर्च करणेकामी अंदाजपत्रकिय निधी तरतुदीचे महानगरपालिका अधिनियम कलम १०३ व लेखा संहिता -१९७१ मधील नियम ३०(३) अन्वये सोबत जोडलेल्या विवरणपत्रकानुसार दर्शविल्या प्रमाणे अग्निशमन साधन सामुग्री खरेदी या लेखाशिर्षकामध्ये रु.२ कोटी तरतुद आहे यामध्ये प्रत्येक्ष झालेला खर्च रु.६,२३,०००/-इतका झालेला आहे व रक्कम रु.१,९३,७७,०००/- शिल्लक आहे. या शिल्लक रक्कमेमधुन रक्कम रु.१,६६,७०,०००/- अत्याधुनिक अग्निशमन गाडी खरेदी करणे या लेखाशिर्षकात वर्ग/ पुनर्वीनियोजन करणे तसेच एक नग नविन १४००० लिटर क्षमतेचे फायर वॉटर ब्राउझर व एक मल्टीपरपझ फायर इंजिन खरेदी करणेकरिता होणा-या खर्चास प्रशासकिय व आर्थीक मान्यता देत आहे.

प्रशासक तथा आयुक्त
भिवंडी नि. शहर महानगरपालिका

नमुना क्रं.१०

नियम ३०(३) पहा

भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका, भिवंडी.

दिनांक - च्या सभेत सादर केलेले पुर्नविनियोजनाचे विवरणपत्र.

| या लेखाशिर्षकातुन | | | | | | या लेखाशिर्षकाकरिता | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अ. क्रं | प्रधान,गौण व तपशील-वार माहिती | बांधकाम विषयक सेवा व इतर | मुळ अनुदान पर्यंत खर्च | आज तारखे पर्यंत खर्च | उपलब्ध शिल्लक | प्रधान,गौण व तपशील-वार माहिती | बांधकाम विषयक सेवा व इतर | मुळ अनुदान पर्यंत खर्च | आज तारखे पर्यंत खर्च | प्रस्तावित वाढीची रक्कम खर्च | अभिप्राय |
| १ | भाग-४ भांडवली खर्च अ-१ पान नं.७४ | अग्निशमन साधन सामुग्री खरेदी | २ कोटी | रु.६,२३,०००/- | रु.१,९३,७७,०००/- | भाग-४ भांडवली खर्च अ-१ पान नं.७४ | अत्याधुनिक अग्निशमन गाडी खरेदी | २ कोटी | निरंक | रु.१,६६,७०,०००/- | एक नग नविन १४००० लिटर क्षमतेचे वॉटर ब्राउझर व एक मल्टीपरपझ फायर इंजिन खरेदी करणेकामी रक्कम कमी असल्यामुळे अग्निशमन साधनसामुग्री खरेदी करणे या लेखाशिर्षकातुन रु.१,६६,७०,०००/- पुर्नविनियोजनाने प्रस्तावित करण्यात येत आहे. |

२/९/२०२०
अग्निशमन अधिकारी
भिवंडी नि.शहर मनपा

खिलीत दिलेल्या अभिप्रायानुसार
मुख्य लेखा परिक्षक
भिवंडी नि.शहर मनपा

मुख्य लेखा व वित्त अधिकारी
भिवंडी नि.शहर मनपा

अति. आयुक्त
भिवंडी नि.शहर मनपा

प्रशासक तथा आयुक्त
भिवंडी नि.शहर मनपा

**भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका, भिवंडी**
**विद्युत विभाग**

**प्रस्तावना**
**प्रति:- मा.प्रशासक तथा आयुक्त्, भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका**

**विषय:- भिवंडी पूर्व मतदार संघातील विविध ठिकाणी हायमास्ट लाईट बसविणे. (मुलभूत सोयी सुविधांचा विकास शासन निधी अंतर्गत )**

**मे सादर,**

महानगरपालिका हद्दीतील भिवंडी पूर्व मतदार संघातील विविध ठिकाणी हायमास्ट पोल लाईट बसविणे. कामी मुलभूत सोयी सुविधांचा विकास अंतर्गत शासन निर्णय क्रमांक मनपा 2023/प्र.क्र 412/ नवि-16 दि.06 जून 2023 नुसार वरिल कामी रुपये. 50 लाख 100% राज्य शासनाच्या हिस्सा नुसार मंजूरी प्राप्त झाली आहे. त्यानुसार सविस्तर अंदाजपत्रक रुपये. 49,99,618/- तयार करण्यात आले होते. त्यास मा.जिल्हाधिकारी सो. यांचे कडिल आदेश क्र.नवि/टे-4/भिनिशमनपा /मुलभूत/प्र.मा/एस.आर-269/2023 दि. 26/09/2023 नुसार प्रशासकिय मान्यता देण्यात आलेली आहे. त्यानुसार सदर कामी दिनांक 20/12/2024 रोजी ई-निविदा मागविण्यात आलेल्या होत्या. त्यानुसार महा टेंडर वर टेंडर क्र.968062 नुसार एकूण 4 निविदा प्राप्त झाल्या. प्राप्त एकूण 4 निविदांची छानणी प्रक्रिया पूर्ण करून प्राप्त तीन निविदाकार यांचे प्राईज बिड दि.18/01/2024 रोजी उघडण्यात आले आहे. त्यानुसार निविदादरांचा तौलानिक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | निविदा धारकाचे नांव | अंदाजपत्रकिय रक्कम | प्राप्त् दर % कमी/जास्त् | निविदा खर्च |
|---|---|---|---|---|
| 1 | मे. हायटेक कंन्स्ट्रक्शन ग्रुप, नवी मुंबई | रु. 49,99,618/- | 0.250% कमी | रु. 49,87,118/- |
| 2 | मे.जॉय थॉमस इंजिनीअरींग प्रा.लि.कळंबोली, राजगड | | 2.500 % जास्त | रु. 51,24,608/- |
| 3 | मे.सार्थक इलेक्टोमेक प्रा.लि.पुणे | | 0.240% कमी | रु. 49,87,618/- |

भिवंडी पूर्व मतदार संघातील विविध ठिकाणी हायमास्ट लाईट बसविणे कार्यान्वये करणे कामी प्राप्त 3 निविदांपैकी सर्वांत कमी दराची मे. हायटेक कंन्स्ट्रक्शन ग्रुप,नवि मुंबई यांची निविदा अंदाजपत्रकीय दरापेक्षा 0.250% कमी दराची म्हणजेच 49,87,118/- खर्चाची होत आहे.

वरील प्रमाणे सर्वात कमी दराचे निविदाकार मे. हायटेक कंन्स्ट्रक्शन ग्रुप, नवी मुंबई यांनी सादर केलेले निविदा दर अंदाजपत्रकिय दरापेक्षा 0.250% कमी आहेत त्यास निविदा समिती तसेच मा.आयुक्त सो. यांची मान्यता घेण्यात आलेली आहे.

महानगरपालिकेत सद्य:स्थितीत मा.महासभा व मा.स्थायी समिती अस्तित्वात नसल्याने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 452 (अ) नुसार मा.प्रशासक म्हणुन अधिकार आपणाकडे असल्याने सदर कामाची सर्वात कमी दराची निविदा मे.हायटेक कंन्स्ट्रक्शन ग्रुप, नवी मुंबई यांचे सोबत म.म.अ. 1949 चे कलम 73(क) नुसार संविदा करणे तसेच आर्थिक मान्यता मिळणेकामी प्रस्ताव सादर करणेत येत आहे. तरी मान्यता मिळावी.

(सुरेश भट्ट )
प्र.शहर अभियंता
भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका,भिवंडी

प्रस्तावना

**विषय:- भिवंडी पूर्व मतदार संघातील विविध ठिकाणी हायमास्ट लाईट बसविणे. (मुलभूत सोयी सुविधांचा विकास शासन निधी अंतर्गत )**

भिवंडी पूर्व मतदार संघातील विविध ठिकाणी हायमास्ट लाईट बसविणे. (मुलभूत सोयी सुविधांचा विकास शासन निधी अंतर्गत )कार्यान्वित करणे कामी रुपये 49,99,618/- खर्चाच्या प्रस्तावास राज्य शासनाने मान्यता दिली आहे. महानगरपालिकेने सविस्तर अंदाजपत्रक तयार करुन तांत्रिक मान्यतेसह निविदा प्रक्रिया राबविणे व ठेकेदार निश्चित करुन त्याबाबतचा प्रगती अहवाल एम.एम.आर.डी. कडे सादर केल्यानंतर त्याबाबतची रक्कम महानगरपालिकेकडे सादर केली जाईल. असे मंजुरी पत्र क्र.MPIU/MLS/CA-28/BNCMC/Street light pole/2022/647 दि.13/09/2022 मध्ये नमुद आहे. त्यानुसार महानगरपालिकेने प्रशासकीय ठराव क्रमांक 43 दिनांक. 17/10/2022 नुसार सुधारीत अंदाजपत्रक रक्कम रुपये 49,99,618/- खर्चाच्या प्रस्तावास प्रशासकिय मान्यतेसह निविदा मागविणेस मा.प्रशासक तथा आयुक्त् सो. यांनी मान्यता दिलेली आहे. त्यानुसार सदर कामी महाटेंडरवर टेंडर क्रमांक 849793 नुसार दिनांक 07/11/2022 ते 21/11/2022 या कालावधित ई निविदा मागविण्यात आल्या. प्राप्त् एकूण 4 निविदा पैकी परिपुर्ण निविदांची छाननी प्रक्रिया पूर्ण करुन पात्र तीन निविदाकार यांचे प्राईज बिड दिनांक 22/11/2022 रोजी उघडण्यात आले आहे. त्यानुसार निविदादरांचा तौलानिक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | निविदा धारकाचे नांव | अंदाजपत्रकिय रक्कम | प्राप्त् दर % कमी/जास्त् | निविदा खर्च |
|---|---|---|---|---|
| 1 | मे. हायटेक कंन्स्ट्रक्शन ग्रुप, नवी मुंबई | रु. 49,99,618/- | 0.250% कमी | रु. 49,87,118/- |
| 2 | मे.जॉय थॉमस इंजिनीअरींग प्रा.लि.कळंबोली, राजगड | | 2.500% जास्त | रु. 51,24,608/- |
| 3 | मे.सार्थक इलेक्टोमेक प्रा.लि.पुणे | | 0.240% कमी | रु. 49,87,618/- |

वरील प्रमाणे निविदाकार मे. हायटेक कंन्स्ट्रक्शन ग्रुप, नवी मुंबई यांनी सादर केलेले निविदा दर अंदाजपत्रकिय दरापेक्षा कमी आहेत व त्यानुसार रक्कम रुपये 49,87,118/- चे खर्च येत आहे व त्यास मा.निविदा समिती तसेच आयुक्त् सो. यांची मान्य्ता घेण्यात आलेली आहे.

महानगरपालिकेत सद्य:स्थितीत मा.महासभा व मा.स्थायी समिती अस्तित्वात नसल्याने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 452 (अ) नुसार मा.प्रशासक म्हणुन अधिकार आपणाकडे असल्याने सदर कामाची सर्वात कमी दराची निविदा मे.हायटेक कंन्स्ट्रक्शन ग्रुप, नवी मुंबई यांचे सोबत म.म.अ. 1949 चे कलम 73(क) नुसार संविदा करणे तसेच आर्थिक मान्य्ता मिळणेकामी प्रस्ताव सादर करणेत आलेला आहे.

**ठराव क्रमांक** 33८ **दिनांक :-** 31/07/2024

**विषय:- भिवंडी पूर्व मतदार संघातील विविध ठिकाणी हायमास्ट लाईट बसविणे. (मुलभूत सोयी सुविधांचा विकास शासन निधी अंतर्गत )**

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडिल शासन आदेश क्र. एमसीओ 2020/प्रक्र 71(भाग-2)नवि-14, दिनांक 06/06/2022 अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम 452 (अ) तरतुदीनुसार मला प्राप्त् झालेल्या अधिकारानुसार मी अजय वैद्य प्रशासक तथा आयुक्त्, भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका वरिल कामी प्र.कार्यकारी अभियंता(विद्युत), शहर अभियंता, मुख्य लेखा परिक्षक, मुख्य लेखा व वित्त् अधिकारी, अतिरीक्त् आयुक्त् यांनी शिफारस केल्यानुसार **भिवंडी पूर्व मतदार संघातील विविध ठिकाणी हायमास्ट लाईट बसविणे.व (मुलभूत सोयी सुविधांचा विकास शासन निधी अंतर्गत ) कार्यान्वित करणेकामी** वरील प्राप्त् निविदानुसार सर्वात कमी दराचे व अंदाजपत्रकानुसार 0.250 कमी दर असलेले निविदाकार मे. हायटेक कंन्स्ट्रक्शन ग्रुप, नवी मुंबई यांचे सोबत म.म.अ. 1949 चे कलम 73(क) नुसार संविदा करणे व त्यानुसार येणाऱ्या रक्कम रुपये 49,99,618/- चे खर्चास आर्थिक मान्यता देत आहे.

**प्रशासक तथा आयुक्त्**

O/C **भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका**

# भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका,भिवंडी

प्रस्तावना :

**विषय :- भिवंडी मनपातील पर्यावरण विभागामार्फत सुरु असलेल्या हवा सर्वेक्षण प्रकल्पास दिनांक ०३ जानेवारी २०२४ ते ३१ डिसेंबर २०२४ पर्यंत मुदतवाढ मिळणेबाबत.**

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका अंतर्गत हवा सर्वेक्षणाचे काम माहे मार्च २०११ पासून मा.महाससभेच्या मान्यतेने मंजुर अटी व शर्ती नुसार ठोक वेतनावर आम्हास नियुक्ती करुन सुरु करण्यात आले. सदर प्रकल्पास वेळोवेळी मा.स्थायी समितीच्या मान्यतेने मुदतवाढ घेण्यात आलेली आहे. सद्यस्थितीत भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेच्या पर्यावरण विभागामार्फत ३ हवा सर्वेक्षण केंद्राचे कामकाज सूरू असून त्याकरीता संपूर्ण खर्च केंद्र शासनद्वारे प्राप्त होत आहे. संदर्भ क्र.२ अन्वये **केंद्रीय प्रदूषण नियंत्रण बोर्ड, पर्यावरण, वन एवं जलवायू परिवर्तन मंत्रालय, भारत सरकार यांचेकडील पत्र क्र. ए-१८०११/६३/२००० (पार्ट२)/एम. ओ. एन. दि.११/०८/२०१६** अन्वये कळविण्यात आले आहे. सदर प्रकल्पास, प्रकल्पातील ०१ पर्यावरण निरिक्षक तथा केमिस्ट व ०३ क्षेत्र सहाय्यक या ठोक वेतनावरील कर्मचाऱ्यांना मा. प्रशासकीस ठराव क्र.१०० दिनांक २७/०२/२०२३ रोजीचा ठरावा अन्वये दि.०३/०१/२०२३ नूसार दि.३१/१२/२०२३ पर्यंत मुदतवाढ घेण्यात आलेली आहे.

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका अंतर्गत सूरू असलेल्या केंद्रीय हवा प्रदूषण सर्वेक्षणाअंती सद्यस्थिती वातावरणात होणारे बदल व हवेची गुणवत्ता सुधारणेचे उदिष्ट निश्चित केलेले असल्याने भिवंडी शहरामध्ये महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत नियमितपणे **Continuous Ambient Air Quality Monitoring Station** कार्यान्वित असून भिवंडी शहरातील हवेची गूणवत्ता व वातावरणात होणारे बदल याबाबत नियमितपणे मोजमाप होणार असल्याने सदर प्रकल्प भिवंडी मनपास निश्चितच उपयुक्त ठरत आहे.

केंद्रीय प्रदुषण नियंत्रण मंडळ, पर्यावरण वन एवं जलवायू परिवर्तन मंत्रालय, भारत सरकार यांचेकडील मान्यतेनुसार भिवंडी मनपा अंतर्गत सुरु असलेले हवा सर्वेक्षणप्रकल्पास कायमस्वरूपी मान्यता मिळाली आहे. त्याअनुषंगाने सदर हवा सर्वेक्षण केंद्र शासनातंर्गत विलिन झाले असून त्याकरीता संपुर्ण अनुदान मिळत आहे. त्याअन्वये सदर केंद्रीय हवा सर्वेक्षण प्रकल्पास व प्रकल्पावरील कर्मचा-यांना कायमस्वरुपी मान्यतेच्या अधिन राहुन मा.अतिरिक्त संचालक, हवा प्रदुषण नियंत्रक, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ मुंबई, यांचेकडील मंजुरी पत्र क्र. **MPCB/JD-APC/SAMP- Extn/B-0181, DATE - 20/12/2023** रोजीचे पत्रान्वये सदर प्रकल्पास, प्रकल्पातील ०१ पर्यावरण निरिक्षक तथा केमिस्ट व ०३ क्षेत्र सहाय्यक या ठोक वेतनावरील कर्मचारी यांना मुदत वाढ देणेकामी पत्र प्राप्त झालेले आहे. परंतु सद्यस्थितीत मा. महासभा व मा. स्थायी समिती गठीत नसल्याने, महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग शासन निर्णय क्र. एमसीओ-२०२०/ प्र.क्र.७१ (भाग-२)/नवि, दि.०६/०६/२०२२ नुसार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषःत कलम ४५२ अ (१अ)व (१ब) अन्वये वरील ठोक वेतन कर्मचाऱ्यांची ठोक वेतनावर पुर्ननियुक्ती होणेस मा. प्रशासक तथा आयुक्त सो., यांची मंजुरी मिळणेस आवश्यक आहे.

तरी भिवंडी महानगरपालिका अतंर्गत सुरु असलेले हवा सर्वेक्षण प्रकल्पास, प्रकल्पातील ०१ पर्यावरण निरिक्षक तथा केमिस्ट व ०३ क्षेत्र सहाय्यक या ठोक वेतनावरील कर्मचाऱ्यांना दोन दिवसाचा विखंड देऊन ०३ जानेवारी २०२४ ते ३१ डिसेंबर २०२४ पर्यंत मुदतवाढ मिळणेस प्रशासकीय व अर्थिक मंजुरीस्तव सविनय सादर.

ठराव क्रं. :- ३४०

दिनांक :- ०१/०२/२०२४

केंद्रीय प्रदुषण नियंत्रण मंडळ, पर्यावरण वन एवं जलवायू परिवर्तन मंत्रालय, भारत सरकार यांचेकडील मान्यतेनुसार भिवंडी मनपा अंतर्गत सुरु असलेले हवा सर्वेक्षणप्रकल्पास कायमस्वरुपी मान्यता मिळाली आहे. मा.अतिरिक्त संचालक, हवा प्रदुषण नियंत्रक, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ मुंबई, यांचेकडील मंजुरी पत्र क्र. **MPCB/JD-APC/SAMP- Extn/B-0181, DATE –20/12/2023** रोजीचे पत्रान्वये सदर प्रकल्पास, प्रकल्पातील ०१ पर्यावरण निरिक्षक तथा केमिस्ट व ०३ क्षेत्र सहाय्यक या ठोक वेतनावरील कर्मचारी यांना मुदत वाढ देणेकामी पत्र प्राप्त झालेले आहे. परंतु सद्यस्थितीत मा. महासभा व मा. स्थायी समिती गठीत नसल्याने, महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग शासन निर्णय क्र. एमसीओ-२०२०/ प्र.क्र.७१ (भाग-२)/नवि, दि.०६/०६/२०२२ नुसार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषःत कलम ४५२ अ (१अ)व (१ब) अन्वये वरील ठोक वेतन कर्मचाऱ्यांची ठोक वेतनावर पुर्ननियुक्ती होणेस मा. प्रशासक तथा आयुक्त सो., यांची मंजुरी मिळणेस आवश्यक आहे. तरी भिवंडी महानगरपालिका अतंर्गत सुरु असलेले हवा सर्वेक्षण प्रकल्पास, प्रकल्पातील ०१ पर्यावरण निरिक्षक तथा केमिस्ट व ०३ क्षेत्र सहाय्यक या ठोक वेतनावरील कर्मचाऱ्यांना दोन दिवसाचा विखंड देऊन ०३ जानेवारी २०२४ ते ३१ डिसेंबर २०२४ पर्यंत मुदतवाढ मिळणेस प्रशासकीय व अर्थिक मंजुरीस्तव सविनय सादर.

(अजय वैद्य)
**प्रशासक तथा आयुक्त**
**भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका**